नि.फौजदारी खटला क्र. १२६/२०२३ निशाणी - १ खाली

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.** १

नांव – विलास निवृत्ती कारंडे

वय ५५ वर्ष, व्यवसाय- शेती

राहणार- कुकटोळी, तालुका कवठेमहांकाळ, जि.सांगली

शपथेवर साक्षीदाराचे सत्यापन...

१. माझी कुकटोळी येथे ग.क्र. ४३० मध्ये माझी शेती आहे. दि. २२.१०.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता मी शेतामध्ये शाळू पेरण्यासाठी गेलो असता त्याठिकाणी माझा भाउ गोरखनाथ, त्याची पत्नी सखुबाई व त्यांचा मुलगा सचिन हातात दगड व काठी घेवून आले व जमीन पेरायची नाही, नाहीतर तुला जिवे मारु अशी धमकी देवू लागले. मी त्यांना म्हणालो की तुम्ही तुमच्या हिश्श्याची जमीन पेरा. त्यावेळी आरोपी गोरखनाथ व सखुबाईने दगडाने माझ्या छातीवर,पायावर मारहाण केली व आरोपी सचिनने काठीने माझ्या छातीवर, पोटावर मारहाण केली. माझी पत्नी मला सोडविण्यास आली असता तिला देखील सखुबाईने दगडाने मारहाण केली. माझा मेव्हणा आकाराम नरुटे हा मला सोडविण्यास आला असता त्याला देखील तिनही आरोपींनी मारहाण केली.

०२. त्यानंतर मी कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यात गेलो. तेथून मी उपचारासाठी कवठेमहांकाळ सरकारी दवाखान्यात गेलो. तेथून मला पुढील उपचारासाठी सांगली सिव्हील हॉस्पीटलला पाठविले. दुस-या दिवशी मी फिर्याद नोंदविण्यासाठी पोलीस ठाण्यात गेलो परंतु पोलिसांनी माझी फिर्याद घेतली नाही. त्यामुळे मी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. या व्यतिरिक्त मला काही सांगावयाचे नाही.

sdxx

विलास निवृत्ती कारंडे | समक्ष

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.04.29 10:30:11 +0530

कवठेमहांकाळ | (अरुण र. व्यवहारे)

दिनांक २६.४.२०२४ | प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, कवठेमहांकाळ

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.** २

नांव –नंदा विलास कारंडे

वय ३८ वर्ष, व्यवसाय- शेती

राहणार- कुकटोळी, तालुका कवठेमहांकाळ, जि.सांगली

शपथेवर साक्षीदाराचे सत्यापन...

१. आमची कुकटोळी येथे ग.क्र. ४३० मध्ये शेती आहे. फिर्यादी विलास माझे पती आहेत. आरोपी गोरखनाथ माझा दिर आहे. आरोपी सखुबाई गोरखनाथची पत्नी व आरोपी सचिन त्यांचा मुलगा आहे. दि. २२.१०.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता ग.क्र. ४३० मध्ये आम्ही शेतामध्ये शाळू पेरण्यासाठी गेलो असता त्याठिकाणी गोरखनाथ, त्याची पत्नी सखुबाई व त्यांचा मुलगा सचिन हातात दगड व काठी घेवून आले व जमीन पेरायची नाही, नाहीतर तुला जिवे मारु अशी माझ्या पतीस धमकी देवू लागले. माझे पती त्यांना म्हणाले की, मी माझ्या हिश्श्यात पेरणी करीत आहे, तुम्ही तुमच्या हिश्श्याची जमीन पेरा. त्यावेळी आरोपी गोरखनाथने दगडाने माझ्या पतीच्या छातीवर,पायावर,पोटावर मारहाण केली व आरोपी सचिनने काठीने माझ्या पतीच्या छातीवर, पोटावर मारहाण केली. मी माझ्या पतीस सोडविण्यास गेली असता मला देखील सखुबाईने हाताने,लाथाबुक्यांनी पोटावर,पाठीवर मारहाण केली. माझ्या नणंदेचा नवरा आकाराम नरुटे हा आम्हाला सोडविण्यास आला असता त्याला देखील आरोपी सचिनने काठीने पोटावर, पाठीवर मारहाण केली. तसेच आरोपींनी आम्हाला शिवीगाळ केली.

०२. माझे पती कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यात गेले. त्यांना उपचारासाठी कवठेमहांकाळ सरकारी दवाखान्यात पाठविले. तेथून त्यांना पुढील उपचारासाठी सांगली सिव्हील हॉस्पीटलला पाठविले. दुस-या दिवशी माझे पती फिर्याद नोंदविण्यासाठी पोलीस ठाण्यात गेले परंतु पोलिसांनी आमची फिर्याद घेतली नाही.आम्ही वारंवार विनंती केली परंतु पोलिसांनी आमची फिर्याद घेतली नाही.

त्यामुळे आम्ही पोलीस अधीक्षक,सांगली यांना देखील तक्रार पाठविली. परंतु आमच्या तक्रार अर्जावर कोणतीही कारवाई न झाल्याने प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. या व्यतिरिक्त मला काही सांगावयाचे नाही.

sdxx

नंदा विलास कारंडे

समक्ष

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.04.29 10:30:21 +0530

कवठेमहांकाळ (अरुण र. व्यवहारे)

दिनांक २६.४.२०२४ प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, कवठेमहांकाळ

नि.फौजदारी खटला क्र. १२६/२०२३ निशाणी - १ खाली

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ३**

नांव – आकाराम तुकाराम नरुटे

वय ५५ वर्ष, व्यवसाय- शेती

राहणार- कुकटोळी, तालुका कवठेमहांकाळ, जि.सांगली

शपथेवर साक्षीदाराचे सत्यापन...

१. फिर्यादी विलास माझा मेव्हणा आहे. दि. २२.१०.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता मी फिर्यादीच्या शेतामध्ये शाळू पेरण्यासाठी ग.क्र.४३१ मध्ये गेलो होतो. त्याठिकाणी गोरखनाथ, त्याची पत्नी सखुबाई व त्यांचा मुलगा सचिन हातात दगड व काठी घेवून आले व जमीन पेरायची नाही, नाहीतर तुला जिवे मारु अशी फिर्यादीस धमकी देवू लागले. फिर्यादी विलास त्यांना म्हणाला की तुम्ही तुमच्या हिश्श्याची जमीन पेरा. त्यावेळी आरोपी गोरखनाथ व सखुबाईने दगडाने विलासच्या छातीवर,पायावर मारहाण केली व आरोपी सचिनने काठीने विलासच्या छातीवर, पोटावर मारहाण केली. विलासची पत्नी सोडविण्यास गेली असता तिला देखील सखुबाईने मारहाण केली. मी देखील भांडण सोडविण्यास गेलो असता आरोपींनी मला देखील मारहाण केली. या व्यतिरिक्त मला काही सांगावयाचे नाही.

sdxx

आकाराम तुकाराम नरुटे समक्ष

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.04.29 10:30:32 +0530

कवठेमहांकाळ (अरुण र. व्यवहारे)

दिनांक २६.४.२०२४ प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, कवठेमहांकाळ